# सामाजिक न्याय संकल्पना: बदलती परिणामे

डॉ. विनोद नारायणदास बैरागी
विभाग प्रमुख राज्यशास्त्र विभाग व संशोधन मार्गदर्शक
चेतना शिक्षण प्रसारक मंडळाचे कला वरिष्ठ महाविद्यालय,
हर्सुल सावंगी, औरंगाबाद.
E-mail – bairagivn@gmail.com
Mob. – 8275086692

---

**प्रस्तावना :**

नव-आधुनिकतावादी आणि नव-भांडवलशाही युगात सामाजिक न्यायाची परिभाषेची परिणामे बदलेली आढळतात. सामाजिक न्यायाची पारंपारिक परिभाषेची नव्या परिप्रेक्ष्यातून मांडणी करण्याची आवश्यकता आहे. पारंपारिक सामाजिक न्याय संकल्पना नवभांडवलशाही युगात कालबाह्य आणि प्रवाह प्रतित बनलेली आहे. सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी परिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या संस्था वा व्यक्तित अपयशाची भीतीघेतलेल्या संस्था वा व्यक्तित अपयशाची भीती भेडसावतांना आढळते. एका बाजूला विकासाचा दर वाढत असतांना दिसतो तर दुसऱ्या बाजूला समाजघटकांतील आर्थिक आणि सामाजिक दरी रुंदावताना दिसते. विकासाच्या वाढलेल्या दरातून सामाजिक विविध घटकांचा संतुलित विकास होण्याऐवजी विषमता वाढत चालेली आहे. असंतुलित विकासातून वंचित घटक विकास प्रक्रियेतून बाजूला ढकलेले जात आहे. साधनसामुग्री आणि उत्पादन वाढ होत असतांनाही दारिद्र्याचे प्रमाण वाढत आहे. या बदलत्या सामाजिक वास्तवतामध्ये सामाजिक न्यायाच्या प्रश्नाला कसे भिडावे हा प्रश्न विविध वैचारिक छावण्यातील सर्वच परिवर्तनवाद्यांना भेडसावत आहे. आपआपल्या परीने परिवर्तनवादी या प्रश्नांचा वेध घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु बदलत्या परिप्रेक्ष्यात सामाजिक न्याय संकल्पनेची नव्याने मांडणी केल्याशिवाय हा प्रश्न सुटण्याची सुतराम शक्यता नाही. म्हणूनच नव आधुनिकतावादी समाज वास्तवाने सामाजिक न्यायाची विविध परिणामे समोर आणली आहेत ती सर्व लक्षत घेऊत सामाजिक न्यायाची व्यापक संकल्पना मांडली गेली पाहिजे. त्याला पूरक कार्यक्रम राबवि पाहिजे तरच सामाजिक न्यायाची संकल्पना बदलत्या परिप्रेक्ष्य त यशस्वी होईल.

**सामाजिक न्याय संकल्पना :**

सामाजिक न्यायाची संकल्पना ही मुख्यत्वे समाजतील सर्व मानव समान आहेत. त्याचा धर्म, वंश, जात, रंग आणि संपदाय यावरुन भेदभाव केला जाऊ नये अशी आहे. स्वतंत्रता हे सामाजिक न्यायाचे महत्वपूर्ण तत्व आहे. सामाजिक न्याय संकल्पनेत आर्थिक, सामाजिक, आणि राजकीय क्षेत्रात समान ातेचा समावेश होतो. स्वातंत्र्यासाठी अधिकाराची गरज भासते. अधिकार हे व्यक्तिमा नैसर्गिक विकासाकरिता आवश्यक असतात. समाजरचना जर असमानतेवर आधारलेली असेल तर स्वातंत्र्याच्या अधिकाराला काहीही अर्थ नसतो. न्यायपूर्ण व्यवस्था म्हणजे समाजाची उभारणी समानतेच्या तत्त्वावर करणे आहे. सामाजिक व्यवस्थेत जितक्या प्रमाणात असमानता आणि विषमता अस्तित्वात असेल त्या समाजात शोषणाची संभावना अधिक असते. म्हणुनच

सामाजिक न्यायाच्या आशयात समतेला सर्वात जास्त महत्व आहे. सामाजिक न्याय संकल्पनेचा अर्थ समाजातील सर्व व्यक्तिना जीवनाचे अस्तित्व टिकविण्यासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी संधीची समानता प्राप्त करून देण हा आहे. प्रत्येक व्यक्तिस जिंवत राहण्यासाठी त्यांच्या मूलभूत वा प्रारंभिक गरजा पूर्ण होऊ शकतील अशी परिस्थिती निर्माण करणे हा होय.

सामाजिक न्यायाचा संबंध व्यक्तिचे अधिकार आणि सामाजिक नियंतत्रण यात संतुलन निर्माण करणे. प्रचलित कायदातंर्गत व्यक्तिच्या वैध आकांक्षाची पूर्ती करुन राष्ट्राची एकता आणि समाजाची आवश्यकता अनुकूल व्यक्ति अधिकाराचे उल्लंघन वा अतिक्रमणाच्या विरुद्ध अधिकार संरक्षणाची हमी देणे हा आहे. सामाजिक न्यायाची संकल्पना अत्यंत व्यापक असून त्यात मागासलेल्या आणि अल्पसंख्याकांचे हितरक्षणापासून गरिबी निमूर्लन, निरक्षरता व शोषण निर्मूलन करुन सर्व वर्गाच्या सामान्य हिताचे रक्षण करणे आहे. वैयक्तिक स्वार्थ सार्वजनिक कल्याणास बाधा आणत असतो. सामाजिक न्यायउत्तरदायित्व राजकीय व्यवस्थेकडे सोपविले असते. सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी राजकीय व्यवस्थेने दलित वा मागासलेल्या वर्गाच्या विकास व हिताकरिता काही ठोस प्रयत्न करण्याची आवश्यकता प्रतिपादित केलेली आहे. राजकीय व्यवस्था सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी ठोस प्रयत्न करीत नसल्याने साने गुरुजी राजकीय व्यवस्था आणि राजकीय श्रेष्ठीजन वर्गाच्या विरोधात जनमत संघटित करुन न्याय स्थापनेचा आग्रह धरतात.

सामाजिक न्यायाचा समानता आणि न्यायावर आधारित सामाजव्यवस्था निर्माण करणे होय. स्वतंत्रता आणि समाता सामाजिक न्यायाचे दोन मूलभूत घटक आहेत. दोघांतील एकाचा उभव सामाजिव न्यायाच्या स्थापनेस बाधक ठरतो. स्वातंत्रता मानवाच्या आंतरिक व बाह्य विकासाकरिता आवश्यक आहे. स्वातंत्र्यावर बंधन लादल्यास व्यक्तिची सृजनशीलतेची शक्ती कमी होते. समानतेच्या उभावात स्वतंत्रेच्या नावाने समाजातील मूठभर व्यक्ती बहुसंख्याकावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करतात. अर्नेस्ट बार्कर लिहितात. 'न्याय हा अंतिम सिद्धात आहे की जो स्वातंत्रा व समानता या दोन्ही तत्वांतील विविध मतामध्ये समन्वय निर्माण करतो.' समता म्हणजे समानता, राज्यशास्त्रातील ही एक विविधांगी आणि बहुचर्चित संकल्पना आहे. सामाजिक, राजकीय, आर्थिक अशी समानतेची विविध अंगे आहेत. राजकीय व्यवस्थेत समानता लागू केल्यास लोकतांत्रिक राजकीय व्यवस्था साकार होते तर सामाजिक क्षेत्रात ती सामाजिक न्यायाकडे नेते आणि आर्थिक क्षेत्रात समाजात योग्य व समान वितरणाचा आग्रह घरते. सामाजिक न्यायाच्या प्राप्तीसाठीमूलभूत अधिकारांना महत्वपूर्ण स्थान असावे. मूलभूत हक्क हे राज्य नागरिकांना प्रदान करते. - अधिकार राज्यातील नागरिकाच्या जीवनविकास आणि न्यायपूर्ण व्यवस्था स्थापन करण्यासाठी विविध कायदेशीर तरतूदी सोबत रंग, लिंग, जन्मजात भेदभाव समाप्त करुन शोषणमुक्त समाजाच्या निर्मितीवर भर देतात. शामाजिक न्याय संकल्पनेच्या पुढील प्रमाणे सांगता येतात.

१. **अर्नेस्ट बार्करच्या मते** - Social Justice represents a synthesis of the principal of Liberty, Equality, Fratennity.

२. **सी. के. एलनच्या मते** - मानवनिर्मित असमानता कमी करण्यासाठी आवश्यक करणे आणि मानवीच्या आत्मोन्नतीच्या व्यावहारिक संधीत बाधा न आणता, वंचित घटकाच्या विकासाकरिता मदत करणे म्हणजे सामाजिक न्याय होय.

३. सामाजिक न्याय म्हणजे मनुष्याच्या सामाजिक, आर्थिक आणि सामाजिक जीवनातील अंसतुलन दूर करुन सामाजातील अधिक कमजोर आणि दुर्बल वर्गाच्या विकासासाठी विशेष सुरक्षा प्रदान करणे होय.

सामाजिक न्यायाचा विविध परिभाषेतून स्वातंत्र्य, समता आणि न्याय निर्मिती करुन समाजातील वंचित आणि मागासलेल्या समाजघटकांच्या विकासासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची गरज मानतो.

**सामाजिक न्याय संकल्पनेचा विकास -**

न्यायाचा योग्य सिद्धांत निर्माण करणे ही राजकीय तत्त्वज्ञानापुढील मुख्य समस्या आहे. राजकीय तत्त्वचिंतनाचा उद्देश लोकांना न्यायपूर्ण समाज व्यवस्था निवडीस मदत करणे हा आहे. पाशीमात्य आणि पूर्वोत्तर राजकीय तत्त्वज्ञान न्याय संकल्पनेला महत्त्वपूर्ण स्थान दिलेले आढळते. न्याय हा राजकीय आणि नैतिक चिंतनाचे अनिवार्य भाग आणि प्रमुख्य आधार आहे. पाशीमात्य राजकीय चिंतनात संकल्पना प्लेटोने रिपब्लिक ग्रंथात मांडलेली होती. ऑगस्टाईनने न्याय हा ईश्वरी राज्याचा प्रमुख आधार मानला होता. थॉमस एक्वीनास, लॉक, रुसो इ. विचारवंतानी न्याय संकल्पनेबाबत चिंतन केलेले आहे. भारतातील प्राचीन राजकीय चिंतनाही न्याय संकल्पनेला महत्त्वपूर्ण स्थान दिलेले आहे. मनु, कौटिल्य, शुक्र, बहुस्मृति, भारद्वाज इत्यादी विचारवंतानी राज्य व्यवस्थामध्याळे न्यायाला महत्व दिले आहे. आधुनिक काळात सामाजिक न्यायाची कल्पना विकसित करण्याचे श्रेय उपयोगितावादी विचारवंत जेरेमी बेथम यांनी विकसित केलेली आहे. बेंथमने अधिकतम लोकांचे अधिकतम सुख हा न्यायाचा आधार मानला तर जे. एस. मिलने मात्रात्मक लक्षाणाला गुणात्मक लक्षणाची जोड देण्याचा प्रयत्न केला. अर्नेस्ट हर्बर्ट स्पेन्सर, मिल्टन, फ्रेडमन, रॉबर्ट नॉझिक इ. विचारवंतानी सामाजिक न्यायाची संकल्पना विकसित करण्यात योगदान दिलेले आहे. जॉन रॉल यानी खऱ्या अर्थाने संधीची न्यायपूर्ण समानता या तत्त्वावर सामाजिक न्याचाची संकल्पना मांडलेली आढळते. याशिवाय सामाजिक न्यायाचा मार्क्सवादी दृष्टीकोन, ॲटोनी ग्रॉमचीने मांडलेली Subaltern न्यायाचीसेंकल्पना आधुनिक काळात मांडलेली आढळते. वरील विचारवंतानी सामाजिक न्यायाची संकल्पना विकसित करण्यात योगदान दिलेले आहे.

**सामाजिक न्यायाची बदलती परिणामे**

विसाव्या शतकातील नव्वदीच्या शकतात रशियातील साम्यवादी राजवटीचा अंत झाल्यानंतर समाज संपला, मार्क्सवाद कालबाह्य झाला; आणि आता नवभांडवलशाही आ णि जागतिकीकरणाचे युग अवतरले अशी हाकाटी सुरु झाली. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील क्रांतीने ज्ञान मुक्त झालेले आहे. आता आपल्याला बदलण्याची वेळ आलेली आहे. जागतिकीकरणाचे समर्थक करु लागले आहेत. खुल्या अर्थव्यवस्थेच्या अनुषंगाने राजकीय ध्येय आणि उद्दिष्ट्ये ही आता बदलावी लागतीत. म्हणून राजकारणाचे व्यावसायीकरण करण्याची गरज विशद केला गेली. या बदलत्या समाजवास्तवामध्ये सामाजिक न्यायाचा प्रश्न कसा सोडवावा हा प्रश्न सर्वच परिवर्तनवादी मांडणी करणाऱ्यांना भेडसावतो आहे.

न्याय तत्व हे समाजबांधणीचे आधारभूत तत्त्व आहे समाजव्यवस्थेत होणारे बदल विविध समाजघटकांना जागे करुन आत्मभान निर्माण करतात. आपल्या समाज व्यवस्थेतील स्थानाचा विचार करुन आपल्या समाजघटकांला कोणत्या गोष्टीपासून वंचित राहावे लागते, याची जाण त्यांना झाल्यावर ते समाजघटक

आपल्या हितसंबंधाच्या जपवणूकीसाठी सामाजिक न्यायाची मागणी करतात. विविध समाज घटकांचे रास्त हितसंबंध हासामाजिक न्यायाचा पाया मानला जातो. विविध समाज घटकांचे रास्त हितसंबंध डावलून सामाजिक न्यायाची चर्चा म्हणजे समाज घटकांची शुद्ध फसवणूक वाटते. म्हणून व्यापक सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी सार्वजनिक हिताची जोपासना व संवर्धन करणे गरजेचे आहे. परंतु नवभांडवलशाही युगात सार्वजनिक हितांना तिलाजंला देऊन वैयक्तिक हितांना प्राधान्य दिल्यामुळे सामाजिक न्यायाच्या व्यापक संदर्भाकडे झालेल्या दुर्लक्षामुळे विकासाची फळे संपूर्ण समाजघटकांन न मिळता सामाजिक विशिष्ट घटकांना मिळतात. शामाजिक न्यायाचे प्रामाणिकपणो लढा देणाऱ्यांना वास्तवतेच भान आहे. त्यामुळे ते नवभांडवलशाहीतून निर्माण होणाऱ्या आर्थिक विषमतेला विरोध करीत आहे. पण हे वास्तविक भान संबंधित समाजघटक आणि सर्वसामान्य जनतेपर्यंत पोह चविण्यात सामाजिक न्यायासाठी लढणाऱ्या संघटना वा व्यक्ति कमी पडता आहेत. त्यामुळेच व्यवस्थेतील प्रस्थापित वग सामाजिक न्यायाच्या संकल्पनेला बंदिस्त करण्यात यशस्वी झालेला आहे.

**सामाजिक न्याय प्रस्थापनेसाठीच्या उपाययोजना :**

नवभांडवलशाही युगात सामाजिक न्यायाची लढाई गुंतागुंतीची झालेली आहे. ही गुंतागुंत नष्ट करुन सामाजिक न्याय बदलत्या परिस्थितीत अंमलबजावणीसाठी पुढाल उपाययोजना करणे गरजेचे वाटते.

१. सामाजिक न्यायाचा प्रश्न अर्थ- सांस्कृतिकसंरचनेतून निर्माण होणाऱ्या विषमतेतून बिकट बनलेला आहे. त्यांचे परिमार्जन करण्यासाठी साधनसामुग्रीच्या पुर्नवाटपातून सामाजिक न्यायाची प्रस्थापना करता येईल.

२.सांस्कृतिक मूल्य रचनेमुळे होणारे अन्यायाचे वा शोषणाचे परिमार्जन सांस्कृतिक मान्यता प्रदान व करुन होऊ शकते.

३. सामाजिक न्यायाचा प्रश्न सोडविण्यासाठी आर्थिक पनर्रचना वा साधनसामुग्री वाटपाचा आग्रह एका बाजूला धरावा लागेल तर दुसऱ्या बाजूला वंचित वा मागासलेल्या समाजघटकांना सांस्कृतिक व सामाजिक मान्यतेचा आग्रह धरावा लागेल. या दोन्ही बाबींच्या समतोलातून सामाजिक न्यायाची प्रस्थापना होऊ शकेल.

४. सामाजिक न्यायाचा प्रश्न तुकड्या-तुकड्यांत मांडला जाईल तोपर्यंत त्यांची सोडवणूक तुकड्या-तुकड्यांत होईल. हे टाळावयाचे असेल तर सामाजिक न्यायाची विविध परिणामे लक्षात घेऊन समग्र परिवर्तनाचा व्यापक मांडणी नव्याने करणे गरजेचे आहे.

५. नवभांडवलशाही व्यवस्थेला पर्याय नाही हा वैचारिक देखावा उभा करण्यात प्रस्थापित समाज घटक यशस्वी झालेले आहेत. त्यामुळे नवभांडवलशाहीच्या समर्थनाची अगतिकता समाजघटकांत निर्माण झालेली आढळते. शामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी भांडवलशाही व्यवस्थेचे चिकित्सा करुनत्यातील उणीवा समाजघटकांपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करणे गरजेचे आहे तसेच नवभांडवलशाही व्यवस्थेला नाकारुन सामाजिक न्यायास देणाऱ्या पर्यायी विकास नीतीची मांडणी करणे आवश्यक आहे.

६. नवभांडवलशाही व्यवस्था परिवर्तन शक्य नसेल तर सामाजिक न्याय निर्मितीसाठी सद्यव्यवस्थेला मानवी

चेहरा वा मानवतावादी स्वरुप देण्याची गरज विशद केली जात आहे. राजकीय व्यवस्था ही शेवटी मानवी हितसंबंध रक्षणासाठी आहे. या वास्तवतेची दखल घेणे क्रमप्राप्त आहे. अन्यथा समूहांचा आक्रोश व्यवस्थेचा यशासाठी दाबला जाईल.

**सारांश :**

नवभांडवलशाही व जागतिकीकरणाच्या युगात सामाजिक न्यायाच्या प्रस्थाप नेसाठी वरील उपयाची आवश्यकता आहे. समाज बांधणी करण्यासाठी सामाजिक न्याय निर्माण करणे गरजेचे आहे. समाजबांधणीची ईमारत विस्कटून जाण्याची शक्यता आहे. या शक्यतेला पूर्णविराम देण्यासाठी सामाजिक न्यायास पुरक वातावरण निर्मितीचा प्रयत्न व्यवस्थेने केली पाहिजे. अन्यथा न्यायापासून वंचित घटक व्यवस्थेला स्थैर्य लाभू देणार नाही. व्यवस्था अस्थिर करण्यासाठी विविध साधनाचा वापर करीत. म्हणूनचव्यवस्थेच्या स्थैर्याकरिता सामाजिक न्यायाची बदलती परिणामे लक्षात घेऊन उपाययोजनेची आवश्यकता सद्यस्थितीत वाटते.

**संदर्भ सूची :**

- अर्नेस्ट बार्कर Principle of Social and Political theory, मॅकमिलन प्रकाशन, लंडन
- जे. सी. जोहरी, आधुनिक राजनीती विज्ञान के सिद्धांत, स्टर्लिंग प्रकाशन, नवी दिल्ली
- डॉ. वीरेन्द्र शर्मा, राजनीती विज्ञान के सिद्धांत, श्री पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली
- डॉ. राजकुमार, राजनीती विज्ञान के सिद्धांत, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नवी दिल्ली
- डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. आंबेडकर आणि ५. भारतीय राज्यघटना, सुगावा प्रकाशन, पुणे
- यशवंत सुमन, निवडक साधना खंड (संपा.ग.प्र. प्रधान, रा. ग. जाधव) साधना प्रकाशन, पुणे